नि.फौ.ख.क. २६५/२००८
चेतना - वि - मंगेश +८
<u>नि.क :-१००</u>

**<u>दोषारोपानंतरचा पुरावा</u>**
**<u>उलट तपास आरोपी कं. ३ ते ९ तर्फे श्री. आर.पी.गायकवाड वकील साहेब</u>**

लग्नाच्यावेळी माझे शिक्षण एम.ए. अर्थशास्त्र व बी.पी.एड. असे झाले होते. लग्नाच्यावेळी आरोपी क्र. १ चे शिक्षण बारावी पर्यंत झालेले होते. लग्नाआधी मी नोकरी करित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व माझे लग्न आमचे कुटुंबियांच्या मर्जीनुसार ठरविण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. १ चे शिक्षण माझेपेक्षा कमी झालेले असल्यामुळे माझा त्या लग्नास विरोध होता. हे म्हणणे खरे नाही की आमचे समाजात हुंडयाची प्रथा नसल्यामुळे लग्न ठरवितांना त्याबाबत कोणतीही बोलणी झाली नव्हती. माझे वडिलांनी हुंडयाचे ५५,०००/- रुपये कोठुन आणले होते याबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही रक्कम हुंडा म्हणुन दिलेली नसल्यामुळे मी त्याबाबत कागदपत्र दाखल केलेले नाही.

न्यायालयात तक्रार दाखल करतेवेळी हुंडयाची रक्कम ही कोणत्या वेळेस, कोणासमक्ष व कोणत्या तारखेस देण्यात आली होती याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही रक्कम दिलेली नसल्यामुळे तसा उल्लेख माझे तक्रारीत नमुद केलेला नाही. लग्नामध्ये माझे वडिलांनी जे दागिणे दिले व जे मी माझे तक्रारीत नमुद केलेले आहे त्याबाबत कोणतेही बिले अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्याचप्रमाणे लग्नातील भेटवस्तुबाबत कोणतीही यादी मी अभिलेखावर दाखल केलेली नाही.

लग्नाच्यावेळी मला जे दागिणे भेट स्वरुपात मिळाले होते त्याबाबत छायाचित्रे काढण्यात आली होती. ती छायाचित्रे मी अभिलेखावर दाखल केलेली नाही. लग्नानंतर आरोपींच्या एकत्र कुटुंबामध्ये मी किती दिवस राहिली हे मला आज आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जेवढे

दिवस मी एकत्र कुटुंबात राहिली त्या दिवसात मी आरोपींविरुद्ध छळाची कोणतीही तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपी क्र. १ हे इतर आरोपींपासुन नागपुर येथे वेगळे राहु लागलो. आम्ही सन २००७ मध्ये वेगळे झालो होतो. हे म्हणणे खरे नाही की २००७ नंतर मी इतर आरोपींच्या एकत्र कुटुंबात राहण्यास परत कधीही गेली नाही. आम्ही एक महिणा वेगळी खोली करुन राहिलो.

आरोपी क्र. १ ने मला त्याचे एकत्र कुटुंबात राहण्यास घेवुन जावे व वैवाहीक संबंध पुन:स्थापित करावे याकामी मी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ सोबत वेगळे राहणे सोडल्यानंतर व माहेरी परत आल्यानंतर मी कौटुंबिक हिंसाचाराची आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतरच मी आरोपी क्र. १ विरुद्ध खावटी मिळण्याकामी अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, ते दोन्ही प्रकरणे सन २००७ मध्ये दाखल करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, ती दोन्ही प्रकरणे प्रलंबित असतांना मी सन २००८ मध्ये प्रस्तुतचे प्रकरण दाखल केले आहे.

पोलीसांनी प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्याआगोदर दिलेल्या तक्रारीवर कार्यवाही केली नाही याबाबत मी त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुषंगाने त्यांच्या वरिष्ठांनी माझा जबाब नोंदविला होता. तसेच घटनेबाबत चौकशीसुद्धा केली होती. हे म्हणणे खरे नाही की त्या चौकशीच्या अनुषंगाने वरिष्ठांनी गुन्हा झाल्याचे निदर्शषनात येत नसल्यामुळे आरोपींविरुद्ध कार्यवाही करता येणार नाही असे मला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, मयत आरोपी क्र. २ हे पोलीस सेवेत होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ४ व ९ हे सुद्धा पोलीस सेवेत आहेत. प्रस्तुतची तक्रार त्यांच्याविरुद्ध दाखल करण्याआधी त्यांच्या वरिष्ठांची परवानगी मी घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींविरुद्ध वेळोवेळी खोटया तक्रार दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की कोणत्याही आरोपीने मला अथवा माझे माहेरच्यांना कधीही पैशाची अथवा सोन्याच्या दागिण्याची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यानुषंगाने मला कोणताही शारिरीक किंवा मानसिक त्रास देण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही

की मी आरोपींसोबत त्यांच्या एकत्र कुटुंबात राहण्यास तयार नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी उच्च शिक्षीत असल्यामुळे आरोपी क्र. १ सोबत सुद्धा राहण्यास तयार नव्हती.

हे म्हणणे खरे आहे की, कुंदा चौधरी नावाच्या महिलेकडुन मला कोणताही त्रास झालेला नसल्यामुळे मी तिच्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही केली नाही. कुंदा चौधरी या महिलेचे वय अंदाजे ४० ते ४५ इतके असावे. तिला पती व मुलं आहेत याबाबत मला माहिती आहे. ती नागपुरमध्ये कोणत्या भागात राहत होती याबाबत मला काहिही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की इतर आरोपींची असे म्हणणे होते की ती महिला ही आरोपी क्र. १ ची मानलेली बहिण आहे.

हे म्हणणे खरे आहे की, ऑगष्ट २००७ पासुन मी माझे माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी पुन्हा आरोपीकडे राहण्यास गेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे माहेरी आल्यानंतर जवळपास सव्वा वर्षानंतर प्रस्तुतच प्रकरण दाखल केलेले आहे. तक्रार उशिरा दाखल करण्याचे कारण मी प्रस्तुतच्या प्रकरणात नमुद केलेले नाही. पोलीसांनी आमचेवर प्रतिबंधात्मक कार्यवाही केली किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना मानसिक त्रास व्हावा या एकमेव हेतुने मी माहेरी आल्यानंतर प्रस्तुतचे प्रकरण दाखल केलेले आहे. पोलीसांनी माझे तक्रारीवर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे मी मा. उच्च न्यायालयात कोणतीही याचिका दाखल केलेली नाही.

दिनांक १०/१०/२००७ रोजी मी आरोपी क्र. १ ला ॲडव्होकेट कु. अनिता एम. साबळे यांचेद्वारे नोटीस पाठविली होती की काय ते मला आज आठवत नाही. त्या वकीलांना मी ओळखते. सदरची नोटीस मी कौटुंबिक न्यायालयातील प्रकरण क्र. ४१२/२००७ मध्ये दाखल केली होती किंवा कसे ते मला आज आठवत नाही. नोटीस पाठविण्याआगोदर आम्ही ॲड. कु. साबळे यांना माहिती दिली होती. आता मला नि.११७ खालील नोटीसची सत्यप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. ती नोटीस मी दिलेल्या माहितीप्रमाणे देण्यात आली होती की काय ते मला आठवत नाही. साक्षीदाराने सदर नोटीसवरिल तिची कबुली केल्याने सहीस ओळखीसाठी

नि.१५० देण्यात येते. त्या नोटीसीमध्ये पैशाचे व दागिण्यांच्या मागणीबाबत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही याबाबत मला माहिती नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की त्या वकीलांनी काय लिहिले याबाबत तिला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क. ३ ते ९ यांना त्रास देण्यासाठी मी त्यांना प्रस्तुत प्रकरणात खोटेपणाने आरोपी बनविले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी त्यांच्याविरुद्ध खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क. १ तर्फे श्री. जरगर वकीलसाहेब</u>**-

आरोपी क्र. १ हा ट्रव्हल्स व्यवसाय करतो त्यासंदर्भात मी कोणतेही दस्त या प्रकरणात दाखल केलेले नाही. माझे तक्रारीचे परिच्छेद क्र. ५ मध्ये नमुद केलेली घटना कोणत्या तारखेस घडली होती ते मला आठवत नाही. ती घटना आरोपीच्या घरीच घडली होती. आरोपी क्र. १ याचे मासिक उत्पन्न किती होते याबाबत मला माहिती नाही. आरोपी क्र. १ हा ज्या-ज्या वेळी मला दारु पिउन मारहाण करायचा त्या-त्या प्रत्येक वेळी मी त्याचेविरुद्ध पोलीसांकडे तक्रार दाखल केली नाही. त्याबाबत मी माझे माहेरच्यांनासुद्धा कोणतीही माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की पहिल्या मुलीच्या जन्माचे वेळी आरोपी क्र. १ हा माझेसोबत नागपुर येथील दवाखान्यात होता. मी गर्भवती असतांना आरोपी क्र. १ ने केलेल्या मारहाणीबाबत मी पोलीसांकडे कोणतीही तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. १ व माझे नेहमीच भांडण तंटे व्हायचे त्यामुळे इतर आरोपींनी आम्हाला सोबत राहु नका असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मी माझे तक्रारीमध्ये नमुद केलेल्या घटना हया कधीही घडलेल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.क.के. माझे समक्ष

**(आर.पी. बाठे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कामठी.
दिनांक : १३/०७/२०१८.

**(आर.पी.बाठे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कामठी.